# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. ०५/०१/२०१७

## गडचिरोली पोलीस विभागामार्फत 'महाराष्ट्र दर्शन' सहलीची चौदावी फेरी रवाना

नक्षलग्रस्त अशा गडचिरोली जिल्हयातील मुलांना महाराष्ट्रातील विविध प्रेक्षणीय स्थळे, उदयोगाची ठिकाणे,शासकिय कार्यालये अशा विविधरंगी व प्रगत महाराष्ट्राचे सहलीच्या माध्यमातून दर्शन व्हावे यासाठी गडचिरोली पोलीस दल व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्या माध्यमातून सातत्याने सहलीचे आयोजन करण्यात येत असून आज दिनांक ०५/०१/२०१७ रोजी या सहलीची चौदावी फेरी रवाना झाली.

दुर्गम आदिवासी भागातील मुलांसोबत नक्षलपिडीत, नक्षलकुटूंबियातील पाल्यांचाही या सहलीत सहभाग असून पोलीस विभागाच्या अधिकारी - कर्मचारी यांच्यासह तब्बल ८३ विदयार्थ्याचा या सहलीत समावेश आहे. आज दिनांक ०५/०१/२०१६ रोजी या सहलीतील विदयार्थ्यांना पोलीस अधिक्षक कार्यालयात पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख, अपर पोलीस अधिक्षक श्री. मंजूनाथ सिंगे, यांनी या विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख यांच्या हस्ते सहलीला हिरवी झेंडी दाखवून सहल रवाना करण्यात आली.

महाराष्ट्रभर फिरतांना त्या त्या भागाच्या आर्थिक, सामाजिक आणि औदयोगिक प्रगतिचा अभ्यास करुन त्याचा उपयोग आपल्या गडचिरोलीला वैभवसंपन्न बनविण्यासाठी करावा व सहलीचा आनंद लुटावा तसेच प्रत्येकाने शिक्षणावर भर देवून आपले व्यक्तिमत्व विकसीत करा आणि आपल्या शिक्षणाचा उपयोग आपल्या भागाला प्रगत करण्यासाठी करा असे प्रतिपादन मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख यांनी केले व शुभेच्छा दिल्या. दरम्यान या कार्यक्रमावेळी विदयार्थ्यांनीही मनोगत व्यक्त करत आदर्श नागरिक बनण्याचा निर्धार केला. या सहलीसोबत पोउपनि किशोर मेढे, पोउपनि

जयसिंग राजपुत, पोलीस कर्मचारी तसेच वैदयकिय अधिकाऱ्यांचे पथक पाठविण्यात आले आहे.

